# नि. क्र. १४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादींनी दि. २१.१२.२०१६ रोजीचा आदेश रद्द करुन त्यांचा लेखी जबाब स्वीकारण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादींचे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ हा सतत आजारी असल्यामुळे व वयोवृध्द असल्यामुळे त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण कागदपत्रे जबाबदावा दाखल करण्यासाठी वेळेत मिळाले नसल्यामुळे लेखी जबाब दाखल करण्यास उशिर झालेला आहे. तसेच प्रस्तुतचे प्रकरण हे रस्त्याविषयी असून व सदर रस्ता हा प्रतिवादीकरीता महत्वाची बाब आहे. त्यामुळे प्रतिवादींची बाजु ऐकणे आवश्यक आहे. जर जबाबदावा स्वीकारला नाही तर प्रतिवादींचे नुकसान होईल व सदरचे नुकसान पैशाच्या स्वरुपात भरुन निघणार नाही, त्यामुळे प्रतिवादींनी अर्ज मंजूर करुन त्यांचा लेखी जबाब स्वीकारण्याची विनंती केली आहे.

३. वादीतर्फे त्यांच्या वकीलांनी सदरच्या अर्जावर त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले आहे की, प्रतिवादींनी जाणून बूजून प्रकरण चालविण्यास विलंब केला आहे. तसेच प्रतिवादींना त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यासाठी पुरेशी संधी देण्यात आली होती, परंतू वेळेमध्ये प्रतिवादींनी त्यांचा लेखी जबाब दाखल केला नाही. तसेच प्रतिवादींनी विलंबाचे जे कारण अर्जात नमुद केले आहे ते योग्य व तर्कसंगत नाही, प्रतिवादींना लेखी जबाब दाखल करण्यासाठी आठ महिने अठरा दिवस इतका विलंब झालेला आहे. म्हणून वादीने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवादी ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले . अभिलेखावरुन दिसून येते की, प्रतिवादींना दाव्याचे समन्स दि. ०३.०८.२०१६ रोजी मिळाले व त्यानंतर त्यांना पुरेशी संधी देऊनही त्यांनी मुदतीमध्ये त्यांचा लेखी जबाब दाखल केलेला नाही, परंतू नैसर्गीक न्यायाच्या दृष्टीकोनातून त्यांची बाजू ऐकणे आवश्यक आहे, त्यामुळे त्यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी संधी देऊन त्यांचा लेखी जबाब स्वीकारणे आवश्यक आहे. परंतू प्रकरणामध्ये

प्रतिवादींनी त्यांचा लेखी जबाब दाखल करण्यास उशिर केला आहे व त्यामुळे प्रकरण प्रलंबीत राहिले, त्याकरीता त्यांच्यावर दंड आकारणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

दि. २१.१२.२०१६ रोजी पारीत केलेला आदेश हा प्रतिवादींनी वादीला खर्च रुपये ५००/– देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो व प्रतिवादींचा लेखी जबाब स्वीकारण्यात येतो.

दिनांक ०७.०८.२०१७
ठिकाण – चाकूर

(**जी.बी. जानकर** )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर चाकूर

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | M. B. Pathan |
| Name of the Court | :- | Civil Judge, J.D., Chakur. |
| Date of Judgment | :- | 07.08.2017 |
| Judgment signed by Presiding Officer on | :- | 07.08.2017 |
| Judgment uploaded on | :- | 07.08.2017 |